| वर्ष - 9 | अंक -21 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

### आतील पानांत

- भारताने २७ चेंडूत जिंकला सामना!
- कुलदीपची फिरकी ठरली टर्निंग पॉईंट
- कार्की होणार नेपाळच्या पंतप्रधान?
- सल्ला घेणे राज्यपालांना बंधनकारक

www.mahaenews.com | गुरुवार, दि. 11 सप्टेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**हवामान धोरण, व्यापारातील अडथळे** युरोपच्या अडथळ्यांना दिलं जाणार उत्तर

# भारत-युरोप व्यापार तणाव!

## ब्राझील-भारत-दक्षिण आफ्रिका मिळून नवीन आंतरराष्ट्रीय व्यासपीठ उभारणार

| पुणे | प्रतिनिधी |
महाईन्यूज

**युरोपकडून अनेक छोट्या-छोट्या गोष्टींवर नियम लावले जात आहे. मात्र आता भारताने युरोपला धडा शिकवण्याची तयारी सुरू आहे. ब्राझील, भारत आणि दक्षिण आफ्रिका हे देश आता एक नवीन आंतरराष्ट्रीय व्यासपीठ तयार करणार आहेत.**



युरोपियन देश आणि युरोपियन यूनियन नेहमीच भारतासाठी डोकेदुखी ठरले आहेत. युरोपकडून अनेक छोट्या-छोट्या गोष्टींवर नियम लावले जात आहे. मात्र आता भारताने युरोपला धडा शिकवण्याची तयारी सुरू आहे. ब्राझील, भारत आणि दक्षिण आफ्रिका हे देश आता एक नवीन आंतरराष्ट्रीय व्यासपीठ तयार करणार आहेत. या व्यासपीठावर हवामान धोरण आणि व्यापार यावर चर्चा केली जाणार आहे. युरोपियन युनियन जंगलतोड आणि कार्बन टॅक्स या कठोर धोरणांची अंमलबजावणी करत आहे. याचा फटका भारतासारख्या विकसनशील देशांच्या व्यापाराला बसत आहे. त्यामुळे आता भारत आणि सहकारी देश एक नवीन व्यासपीठ तयार करणार आहेत. ब्राझील नोव्हेंबरमध्ये COP30 हवामान परिषदेचे आयोजन करणार आहे. यावेळी जागतिक व्यापार संघटनेच्या व्यासपीठावर या नवीन व्यासपीठ तयार करण्याचा प्रस्ताव सादर केला जाणार आहे. हवामान बदलाच्या बहाण्याने व्यापार थांबवण्याच्या युरोपच्या प्रयत्नाला उत्तर देण्यासाठी या व्यासपीठाची स्थापना केली जाणार आहे. ब्राझीलच्या मते, WTO किंवा UN हे हवामानाबाबत चर्चा करण्यासाठी योग्य व्यासपीठ नाही. आगामी काळात नवीन व्यासपीठ तयार केले जाईल आणि मालाचे उत्पादक आणि खरेदीदार यांच्यासाठी सोपे आणि व्यावहारिक उपाय शोधेल. याचा मोठा फायदा व्यापाऱ्यांना होणार आहे.

### भारतासाठी हे व्यायपीठ का महत्त्वाचे आहे?

भारत आणि इतर देशांवर युरोपियन धोरणांचा थेट परिणाम होतो. कारण भारतातून युरोपला मोठ्या प्रमाणात स्टील, सिमेंट, कॉफी, कोको आणि सोयाबीनची निर्यात केली जाते. युरोप आता काही नवीन कायदे लागू करणार आहे. त्यामुळे कर वाढण्याची शक्यता आहे. या थेट परिणाम व्यापारावर होणार आहे. भारताने आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर अनेक वेळा हवामान बदलाशी लढण्याबाबत भाष्य केले आहे. मात्र हवामान बदलाच्या नावाखाली व्यापारात अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न युरोपकडून होत आहे. त्यामुळे भारत ब्राझील आणि दक्षिण आफ्रिका या देशांसाठी नवीन व्यासपीठ फायदेशीर ठरण्याची शक्यता आहे.

### युरोपचं म्हणणं काय आहे?

युरोपियन युनियन असं म्हणत आहे की, कार्बन टॅक्स हा व्यापारात अडथळा नाही. युरोपियन उद्योग कार्बन उत्सर्जनासाठी मोठी फी भरत आहेत, त्यामुळे परदेशी कंपन्यांनीही अशी फी भरावी असं युरोपचे म्हणणे आहे. मात्र युरोपचा खरा हेतू हा कार्बन टॅक्सच्या माध्यमातून युरोपच्या बाजारपेठेचे संरक्षण करणे हा आहे.

## भारत-अमेरिका व्यापार करार ठरणार गेमचेंजर

भारत सध्या अमेरिकेसोबत द्विपक्षीय व्यापार करारावर चर्चा करत आहे. हा करार झाल्यास भारताला इतर देशांवर स्पर्धात्मक आघाडी मिळेल. २०२४ मध्ये भारताने अमेरिकेला एकूण ९१ अब्ज डॉलर्सचा माल निर्यात केला. जर हा करार पूर्ण झाला, तर भारताची अमेरिकन बाजारपेठेतील हिस्सेदारी आणखी वेगाने वाढेल. EU वर प्रस्तावित अमेरिकन टॅरिफ भारतासाठी फक्त एक संधीच नाही, तर रणनीतिक व्यापार विस्ताराचं माध्यम ठरू शकतं.

## १ लाख कोटी रुपयांहून अधिक व्यापार भारताच्या हाती

अमेरिका आणि युरोपियन युनियन (EU) यांच्यात वाढत्या व्यापारिक तणावामुळे भारतासाठी मोठं दार उघडलं आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी EU मधून होणाऱ्या आयातीवर ५०% टॅरिफ लावण्याची घोषणा केली होती. मात्र आता हा निर्णय ९ जुलैपर्यंत पुढे ढकलण्यात आला आहे. या निर्णयामुळे युरोपियन निर्यातीवर मोठा धोका निर्माण झाला असून भारतासारख्या देशांसाठी अमेरिकन बाजारपेठेत आपली हिस्सेदारी वाढवण्याची संधी निर्माण झाली आहे. २०२४ मध्ये EU ने अमेरिकेला एकूण ६८६ अब्ज डॉलर्सचा माल निर्यात केला, त्यापैकी ३०५ अब्ज डॉलर्सच्या उत्पादनांमध्ये EU ची हिस्सेदारी ५०% पेक्षा जास्त होती. उदाहरणार्थ, लस आणि सिरममध्ये EU ची हिस्सेदारी ६८.३% होती, तर काही विशिष्ट औषधांमध्ये ५१% आणि प्रोटीन हार्मोनमध्ये तब्बल ९५% पर्यंत होती. अमेरिकेत आयात होणाऱ्या सुमारे ५,५०० वस्तू वर्गांपैकी १,०३७ वर्गांमध्ये EU ची हिस्सेदारी ५०% पेक्षा जास्त होती.

## भारताला मिळू शकतो १.१ लाख कोटी रुपयांचा फायदा

एका अहवालानुसार, या टॅरिफ युद्धामुळे भारताला १३.८ अब्ज डॉलर्स (सुमारे १.१ लाख कोटी रुपये) इतका फायदा होऊ शकतो. काही उत्पादनांमध्ये भारताची अमेरिकेतली हिस्सेदारी EU पेक्षा आधीपासूनच जास्त आहे—जसे की ट्रॅक्टर टायर आणि हिरे.

२०२४ मध्ये भारताने अमेरिकेला ६.९ अब्ज डॉलर्सचे हिरे आणि ३.१ अब्ज डॉलर्सचे दागिने निर्यात केले होते, तर EU कडून अनुक्रमे फक्त १.८ अब्ज डॉलर्सचे हिरे आणि ३.६ अब्ज डॉलर्सचे दागिने निर्यात झाले होते. हे भारताच्या जास्त स्पर्धात्मक स्थितीचं दर्शन घडवतं.

भारताच्या ६४४ टॅरिफ लाइनमध्ये EU पेक्षा जास्त निर्यात होती. जर भारताने या श्रेणींमध्ये आपली निर्यात आणखी वाढवली, तर एकट्या या क्षेत्रांतूनच ८.५ अब्ज डॉलर्सचा अतिरिक्त फायदा मिळू शकतो.

आंदेकरच्या घरात झडती

## बंडू आंदेकरसह साथीदारांविरुद्ध 'मकोका'

# आंदेकर टोळीच्या बेकायदा बांधकामांवर कारवाई!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**नाना पेठेतील टोळीयुद्ध, तसेच कौटुंबिक वादातून आयुष कोमकर याच्या खून प्रकरणात आंदेकर टोळीचा म्होरक्या सूर्यकांत उर्फ बंडूअण्णा आंदेकर याच्यासह १३ साथीदारांविरुद्ध पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मकोका) कारवाई करण्याचे आदेश दिले.**

## गावांमुळे प्रभागांचे क्षेत्रफळ वाढले





अभियांत्रिकी महाविद्यालयात शिक्षण घेणारा आयुष हा बंडू आंदेकरचा नातू होता. माजी नगरसेवक वनराज आंदेकर याच्या खुनाचा बदला घेण्यासाठी या प्रकरणातील आरोपी गणेश कोमकर याचा मुलगा आयुष याचा आंदेकर टोळीने खून घडवून आणला. या प्रकरणी आठ जणांना अटक करण्यात आली आहे. खून प्रकरणात पसार आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.आंदेकर टोळीचा म्होरक्या सूर्यकांत उर्फ बंडूअण्णा राणोजी आंदेकर (वय ६४), आंदेकर याचा नातू तुषार वाडेकर (वय २४), स्वराज वाडेकर ( वय २१), विवाहित मुलगी वृंदावनी वाडेकर (वय ४०), तसेच अमन युसूफ पठाण उर्फ खान (वय २२, सर्व रा. नाना पेठ), सुजल मेरगू (वय २३) यांना बुलढाणा परिसरातून अटक करण्यात आली. कोमकर खून प्रकरणात आरोपी अमित पाटोळे (वय १९), यश पाटील (वय १९) यांना यापूर्वी अटक करण्यात आली आहे. कृष्णराज उर्फ कृष्णा आंदेकर (वय ४०), शिवम आंदेकर (वय ३१), लक्ष्मी आंदेकर (वय ६०), अभिषेक आंदेकर (वय २१) शिवराज आंदेकर (वय २०, सर्व रा. नाना पेठ) हे पसार झाले आहेत.आंदेकर टोळीच्या म्होरक्या बंडू आंदेकरसह १३ आरोपींविरुद्ध 'मकोका' कारवाई करण्याचा प्रस्ताव समर्थ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांनी तयार केला. अतिरिक्त पोलीस आयुक्त राजेश बनसोडे, परिमंडळ एकचे पोलीस उपायुक्त ऋषीकेश रावले यांच्याकडे प्रस्ताव पडताळणीसाठी पाठविण्यात आला. त्यानंतर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी आंदेकर टोळीविरुद्ध 'मकोका' कारवाई करण्याचे आदेश दिले.आंदेकर टोळीचा म्होरक्या बंडू आंदेकर, तसेच साथीदारांनी दहशतीच्या बळावर बेकायदा बांधकामे केली आणि बेकायदा मालमत्तांचा ताबा घेतल्याचा संशय आहे. याबाबत पोलिसांकडून महापालिकेशी पत्रव्यवहार करण्यात येणार आहे. आंदेकर टोळीला आर्थिक रसद पुरविणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे.बंडू आंदेकर याचे नाना पेठेतील डोके तालमीजवळ घर आहे. बुधवारी रात्री पोलिसांनी त्याच्या घराची झडती घेतली. आंदेकर याला नाना पेठेत आणण्यात आले. आयुष कोमकर खून प्रकरणात काही पुरावे सापडतात का, या

### पोलिसांची मोठी कारवाई

आंदेकर टोळीविरुद्ध 'मकोका' कारवाई करण्याचे आदेश दिले. आंदेकर टोळीचा म्होरक्या बंडू आंदेकर, तसेच साथीदारांनी दहशतीच्या बळावर बेकायदा बांधकामे केली आणि बेकायदा मालमत्तांचा ताबा घेतल्याचा संशय आहे. याबाबत पोलिसांकडून महापालिकेशी पत्रव्यवहार करण्यात येणार आहे. आंदेकर टोळीला आर्थिक रसद पुरविणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे.बंडू आंदेकर याचे नाना पेठेतील डोके तालमीजवळ घर आहे.

दृष्टीने झडती घेण्याचे काम सुरू होते.अभियांत्रिकी महाविद्यालयात शिक्षण घेणारा आयुष हा बंडू आंदेकरचा नातू होता. माजी नगरसेवक वनराज आंदेकर याच्या खुनाचा बदला घेण्यासाठी या प्रकरणातील आरोपी गणेश कोमकर याचा मुलगा आयुष याचा आंदेकर टोळीने खून घडवून आणला. या प्रकरणी आठ जणांना अटक करण्यात आली आहे. खून प्रकरणात पसार आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.आंदेकर टोळीचा म्होरक्या सूर्यकांत उर्फ बंडूअण्णा राणोजी आंदेकर (वय ६४), आंदेकर याचा नातू तुषार वाडेकर (वय २४), स्वराज वाडेकर ( वय २१), विवाहित मुलगी वृंदावनी वाडेकर (वय ४०), तसेच अमन युसूफ पठाण उर्फ खान (वय २२, सर्व रा. नाना पेठ), सुजल मेरगू (वय २३) यांना बुलढाणा परिसरातून अटक करण्यात आली. कोमकर खून प्रकरणात आरोपी अमित पाटोळे (वय १९), यश पाटील (वय १९) यांना यापूर्वी अटक करण्यात आली आहे. कृष्णराज उर्फ कृष्णा आंदेकर (वय ४०), शिवम आंदेकर (वय ३१), लक्ष्मी आंदेकर (वय ६०), अभिषेक आंदेकर (वय २१) शिवराज आंदेकर (वय २०, सर्व रा. नाना पेठ) हे पसार झाले आहेत.आंदेकर टोळीच्या म्होरक्या बंडू आंदेकरसह १३ आरोपींविरुद्ध 'मकोका' कारवाई करण्याचा प्रस्ताव समर्थ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांनी तयार केला. अतिरिक्त पोलीस आयुक्त राजेश बनसोडे, परिमंडळ एकचे पोलीस उपायुक्त ऋषीकेश रावले यांच्याकडे प्रस्ताव पडताळणीसाठी पाठविण्यात आला.

# बारामतीत १५३ अवजड वाहनांवर कारवाई

## 153 वाहनांवर कारवाई करण्यात आली ; एक लाख 58 हजाराचा दंड

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शहरातील वाहतूक कोंडी, अपघातांचा धोका आणि नागरिकांची सुरक्षितता यांचा विचार करून बारामतीत वाहतूक पोलिसांकडून अवजड वाहनांची तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत १५३ वाहनांवर कारवाई करण्यात आली असून, एक लाख ५८ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला.**




ही मोहीम २७ जुलै ते ९ सप्टेंबर २०२५ या कालावधीत राबविण्यात आली. तपासणी दरम्यान नियमभंग करणारी अनेक वाहने आढळली. त्यापैकी काही अवजड वाहने ही ताब्यात घेऊन वाहतूक शाखेच्या कार्यालयात ठेवण्यात आली आहेत. परवाना जवळ नसणे, नो-एन्ट्री झोनमध्ये प्रवेश करणे, वाहन धोकादायक पद्धतीने चालविणे, वाहन विमा नसणे, प्रदुषण तपासणी प्रमाणपत्र नसणे, फॅन्सी नंबरप्लेट लावणे आदी नियमभंग करणाऱ्या वाहनांवर ही कारवाई करण्यात आली.'वाहतुकीच्या नियमांचे काटेकोर पालन करणे हे प्रत्येक वाहन चालकाचे कर्तव्य आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध

### एक लाख ५८ हजार रुपयांचा दंड

'वाहतुकीच्या नियमांचे काटेकोर पालन करणे हे प्रत्येक वाहन चालकाचे कर्तव्य आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध कारवाई सुरू राहणार आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी या उपाययोजना करण्यात येत आहेत. वाहनचालकांनी कागदपत्रे जवळ ठेवावी. १५३ वाहनांवर कारवाई करण्यात आली असून, एक लाख ५८ हजार रुपयांचा दंड

कारवाई सुरू राहणार आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी या उपाययोजना करण्यात येत आहेत. वाहनचालकांनी कागदपत्रे जवळ ठेवावी. ही मोहीम २७ जुलै ते ९ सप्टेंबर २०२५ या कालावधीत राबविण्यात आली. तपासणी दरम्यान नियमभंग करणारी अनेक वाहने आढळली. त्यापैकी काही अवजड वाहने ही ताब्यात घेऊन वाहतूक शाखेच्या कार्यालयात ठेवण्यात आली आहेत. परवाना जवळ नसणे, नो-एन्ट्री झोनमध्ये प्रवेश करणे, प्रदूषण तपासणी प्रमाणपत्र नसणे, फॅन्सी नंबरप्लेट लावणे आदी नियमभंग करणाऱ्या वाहनांवर ही कारवाई करण्यात आली.

## पुणे मेट्रो लाइन-३ मार्च पर्यंत काम पूर्ण होण्याचा प्रशासनाचा दावा

# हिंजवडी मेट्रोचे काम अंतिम टप्प्यात!

## 90 टक्के काम पूर्ण; मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनंतर कामाला गती

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**माण, हिंजवडी ते शिवाजीनगर या मार्गावरील पुणे मेट्रो लाइन-३ या मार्गाचे काम डिसेंबरमध्ये पूर्ण करण्याच्या सूचना मुख्यमंत्री तथा ‘पीएमआरडीए’चे अध्यक्ष देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या होत्या. त्यानुसार या मार्गावर मेट्रोची चाचणी सुरू आहे. या लाईनचे काम अंतिम टप्प्यात असून मार्च पर्यंत काम पूर्ण होण्याचा दावा प्रशासनाच्या वतीने करण्यात आला आहे.**



पुणे मेट्रो लाइन-३ हा महत्त्वाचा प्रकल्प पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) यांच्या माध्यमातून उभारला जात आहे. टाटा कंपनी आणि सिमेन्स समूहाच्या नेतृत्वाखाली ‘पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेड’ यांच्यातील सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) मॉडेलअंतर्गत विकसित करण्याचे काम सुरू आहे. पुण्यातील विद्यापीठ येथील दुहेरी उड्डाणपूल प्रकल्पामुळे या मेट्रो प्रकल्पाला उशीर झाला होता, तर दुसरीकडे हिंजवडीतील नागरी समस्या, वाहतूककोंडी या पार्श्वभूमीवर मेट्रो सुविधा लवकर सुरू व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती. दरम्यान, मुख्यमंत्री फडणवीस यांनी सर्व शासकीय आस्थापनांसाठी ‘सिंगल पॉइंट ऑथॉरिटी’ तयार करून डिसेंबरपर्यंत मेट्रो सुरू करण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यानंतर आता मेट्रोच्या कामाला गती देण्यात आली आहे.

या कामाला २५ नोव्हेंबर २०२१ रोजी सुरुवात करण्यात आली होती, तर कामाची मुदत वाढवून ती आता मार्च २०२६ पर्यंत करण्यात आली आहे. मेट्रो प्रकल्पाचे ९० टक्के काम पूर्ण झाल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. तर, स्थानकाचे कामदेखील सुरू असून, काही स्थानके अंतिम टप्प्यात आहेत. त्यामुळे आता उरलेल्या तीन महिन्यांमध्ये १० टक्के काम पूर्ण करणे हे ‘पीएमआरडीए’ समोर उद्दिष्ट आहे. माण डेपोपासून अवघ्या काही किलोमीटरपर्यंत मेट्रोची चाचणी यापूर्वी घेण्यात आली. मात्र, काही दिवसांपूर्वी प्रथमच हिंजवडीच्या बाहेर म्हणजेच बालेवाडीपर्यंत मेट्रोची चौथी चाचणी घेण्यात आली. हे अंतर जवळपास १२ किलोमीटर होते. सर्वांत पहिली चाचणी जुलैमध्ये घेण्यात आली होती. त्यानंतर हिंजवडीच्या बाहेर सुमारे १० स्टेशन्स पर्यंत मेट्रो धावली.

### काही चाचण्या बाकी

मेट्रोचे बांधकाम ९० टक्के पूर्ण झाले आहे. तर, स्थानकातील जिन्याचे काम सुरू आहे. काही स्थानकांचे ९०, तर काही स्थानकांचे ८० टक्के काम पूर्ण झाले आहे. आणखी काही चाचण्या बाकी असल्याने त्या पूर्ण झाल्यानंतरच मेट्रो सर्व स्टेशनवर धावू शकणार आहे.

“ डिसेंबरपर्यंत सर्व कामे पूर्ण होऊन त्या अनुषंगाने चाचण्या पूर्ण करण्याचे नियोजन आहे. मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. लवकरात लवकर काम पूर्ण करण्याबाबत पाठपुरावा सुरू आहे.

**-रिनाज पठाण,** (मुख्य अभियंता, पीएमआरडीए)

---

# प्रारूप प्रभाग रचनेवरील सूचना व हरकतींची सुनावणी पूर्ण

## पिंपरी चिंचवड महापालिका निवडणूक : शहरातील 32 प्रभागांसाठी सुनावणी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेने प्रसिद्ध केलेल्या प्रारूप प्रभाग रचनेवर प्राप्त हरकती व सूचनांची सुनावणी आज चिंचवड येथील ॲटो क्लस्टर सभागृहात पार पडली. सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव तथा प्राधिकृत अधिकारी प्रविण दराडे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही सुनावणी प्रक्रिया पार पडली.**




महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, निवडणूक विभागाचे सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांनी सुनावणी प्रक्रियेचे कामकाज पार पाडले. यावेळी सहशहर अभियंता मनोज सेठीया, बापु गायकवाड, अनिल भालसाकळे, सहाय्यक नगररचना संचालक प्रशांत शिंपी, उपायुक्त अण्णा बोदडे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, माहिती व तंत्रज्ञान अधिकारी विजय बोरुडे, सहाय्यक आयुक्त मुकेश कोळप, विशेष अधिकारी किरण गायकवाड आदी यावेळी उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड महापालिकेने २२ ऑगस्ट २०२५ रोजी ३२ प्रभागांची प्रारूप रचना जाहीर केली होती. प्रारूप प्रभाग रचनेचे नकाशे महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले होते. तसेच महापालिका भवनामध्येही हे नकाशे माहितीसाठी प्रदर्शित करण्यात आले होते. प्रारूप प्रभाग रचनेवर हरकती व सूचना देण्यासाठी गुरुवार ४ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी तीन वाजेपर्यंत मुदत देण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर आज प्रभागनिहाय टप्प्याटप्प्याने सुनावणी घेण्यात आली.

या सुनावणीदरम्यान हरकतदारांनी त्यांच्या हरकतीच्या अनुषंगाने अतिरिक्त स्वरूपात म्हणणे सादर केले .हरकतदाराची हरकत, त्यांनी सुनावणी दरम्यान सादर केलेले म्हणणे, शासनाचे निर्देश आणि त्या अनुषंगाने समोर येणारी वस्तुस्थिती लक्षात घेऊन प्रत्येक हरकत निर्णित करण्यात येणार आहे. तदनंतर अंतिम प्रभाग रचना शासनाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

### अशी पार पडली प्रभागनिहाय सुनावणी

प्रारूप प्रभाग रचनेवर प्राप्त हरकतींच्या सुनावणीसाठी हरकतदारांना पूर्वसूचना देऊन उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्या अनुषंगाने प्रभागनिहाय व हरकतीच्या क्रमांकानुसार हरकतदारांना वेळ कळवण्यात आली होती. या सुनावणीचे वेळापत्रकही जाहीर करण्यात आले होते. या वेळापत्रकानुसार दुपारी १ वाजता प्रभाग क्रमांक १, २, ११ आणि १२ वर आलेल्या हरकतींची, दुपारी २ वाजता प्रभाग क्रमांक ३, ४, ६, ७, ८, ९, १०, १४ आणि २० वर आलेल्या हरकतींची, दुपारी ३ वाजता प्रभाग क्रमांक १० आणि ११ वर आलेल्या हरकतींची आणि सायंकाळी ४ वाजता प्रभाग क्रमांक २३, २४, २५, २६, २९, ३१ आणि ३२ वर आलेल्या हरकतींची सुनावणी सुरू करण्यात आली.




**'गरजवंत' मराठ्यांची आरक्षणासाठीची लढाई जातीय वाटत असली, तरीही ती दीर्घकालीन जातीअंतर्गत वर्गलढ्याची प्रस्तावना ठरावी. आजचे गरजवंत मराठ्यांचे मागासलेपण प्रामुख्याने नवउदार अर्थव्यवस्थेमध्ये शेती या जातीआधारित व्यवसायातून आले असले, ऐतिहासिक संदर्भ विसरता येणार नाहीत. किंबहुना ऐतिहासिक अज्ञानामुळेच गरजवंत मराठ्यांना स्वतंत्र सांस्कृतिक लढा उभारता आलेला नाही.**

# 'गरजवंता'लाही अक्कल असू शकते

गरजवंत मराठ्यांभोवतीचे ऐतिहासिक संदर्भ आपल्याला सव्वाशे वर्षांपूर्वीच्या शाहू महाराजांच्या वेदोक्त प्रकरणापर्यंत आणि त्यानंतर कुणबी आणि इतर मागासलेल्या जातींच्या मोठ्या प्रमाणात झालेल्या 'मराठाकरणा'पर्यंत मागे घेऊन जातात. यामुळेच आजही १०० वर्षांपूर्वीच्या कुणबी नोंदी सापडतात, आणि त्यानंतर होणारा आश्चर्ययुक्त आनंद ऐतिहासिक अज्ञानही उघडे पाडत असतो. कुणब्यांच्या मराठाकरणातून होणाऱ्या या ब्राह्मणीकरणाची चाहूल फुले यांना एकोणिसाव्या शतकातच लागली होती आणि त्यासंदर्भात त्यांनी आपल्या 'शेतकऱ्याचा आसूड (१८८१)' या ग्रंथात कुणब्यांना सूचक समजही दिली होती. आज खानदानी मराठ्यांनी निवडणुकीच्या राजकारणाचे क्षेत्र व्यापल्यामुळे मराठाकरणाने कुणब्यांना बहुसंख्याक असण्यातून येणारे




सामाजिक लाभ मिळण्याचा आभास जरी निर्माण केला, तरी हा आभास किती तकलादू होता हे १९८० नंतरच्या नवउदार अर्थव्यवस्थेने आणि त्यातून वाढत गेलेल्या मराठ्यांमधील वर्गीय दरीने दाखवून दिले. इकडे मराठवाड्यात महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर प्रादेशिक असमतोलाचा समांतर प्रवास चालूच होता आणि २१ व्या शतकात येईपर्यंत त्याने भीषण रूप धारण केले. निजामाच्या राजवटीत कुणबी असलेल्या मराठ्यांना याचा सर्वात मोठा फटका बसला.

स्वातंत्र्यानंतर एकीकडे पंजाबराव देशमुख यांचा सल्ला धुडकावून पश्चिम महाराष्ट्रातल्या मराठ्यांनी स्वत:ला कुणबी म्हणणे नाकारले, आणि दुसरीकडे महाराष्ट्रात विलीन झाल्यानंतर मराठवाड्यातील कुणब्यांना नाहक मराठा व्हावे लागले. शेती कसणाऱ्या या कुणब्यांकडे क्वचितच जमिनीची मालकी होती. १९४८ मध्ये गांधी हत्येनंतर खेड्यापाड्यांतून वतनदार ब्राह्मणांची झालेली हकालपट्टी, साठच्या दशकातील रिपब्लिकन पक्ष आणि इतर पक्षांनी दिलेला भूमिहीनांचा लढा, सत्तरच्या दशकातील कूळकायदा आणि ऐंशी - नव्वदच्या दशकात कुणब्यांच्या शिकलेल्या पहिल्या पिढीकडे आलेली आर्थिक सुबत्ता या प्रमुख चार कारणांमुळे बऱ्याच कुणब्यांकडे शेतीची मालकी आली. त्यामुळे 'आम्ही भूतकाळात वतनदार होतो आणि इतर जातींना आम्ही पोसत होतो', ही गरजवंत मराठ्यांची समजूत निखालसपणे अज्ञानावर उभी आहे.बौद्धिक काम आणि शारीरिक काम यावरून तयार झालेल्या जातींच्या उतरंडीत शेती कसण्याच्या कुणब्यांच्या व्यवसायाला अंगमेहनतीची अप्रतिष्ठा होती. इतर शूद्रातिशूद्रांप्रमाणेच कुणब्यांना शिकण्याचा अधिकार नव्हता. साधारणपणे साठ-सत्तरच्या दशकात पश्चिम महाराष्ट्रातील कुणब्यांची पहिली पिढी शिकली आणि त्यातील काहींनी सरकारी तसेच खासगी क्षेत्रात नोकऱ्या मिळवल्या. त्यामुळे इतर प्रदेशांच्या मानाने त्यांचे मराठाकरण वेगाने झाले. आजच्या मराठवाडा आणि विदर्भात कुणब्यांची पहिली किंवा दुसरीच पिढी शिक्षणात आलेली दिसून येते, त्यामुळे तेथील कुणबी पश्चिम महाराष्ट्रातील कुणब्यांच्या तुलनेत शैक्षणिकदृष्ट्या बरेच मागे पडलेले दिसतात. आरक्षणाला सामाजिक आणि शैक्षणिक आधार आवश्यक असल्यामुळे आर्थिक आधारावरचे मुद्दे न्यायालयीन कसोटी पार करू शकत नाहीत. ब्राह्मणी व्यवस्थेकडून ऐतिहासिकता, प्रतिनिधित्वाऐवजी गरजवंत मराठ्यांच्या आर्थिक परिस्थितीभोवती चर्चा घुटमळत ठेवली जाते. गरजवंतांना ऐतिहासिकतेशी देणे-घेणे नाही. आपले सामाजिक स्थान काय होते, विसाव्या शतकाच्या पूर्वसंध्येला मूठभर असणारी मराठा लोकसंख्या १९३१ च्या जातीय जनगणनेपर्यंत ३१ टक्क्यांवर कशी पोहोचली, आपण खानदानी मराठ्यांशी कसे जोडले गेलो, आदी प्रश्नांबाबतचे अज्ञान गरजवंतांमध्ये आहे. त्यामुळेच ते आपले प्रतिनिधित्व खानदानी मराठ्यांपासून वेगळे काढून पाहू शकलेले नाहीत.

## संपादकीय »

# तरुण आणि करुण

***नेपाळी तरुणांचा हिंसेचा मार्ग दुर्दैवीच, पण जगभरच्या अनेक देशांत कधी ना कधी तरुणांच्या संतापामुळेच अनपेक्षित राजकीय बदल घडून आलेले आहेत...***

मारहाणीत माजी पंतप्रधान रक्तबंबाळ झाले आहेत, अर्थमंत्र्यांस लाथाबुक्क्यांनी तुडवले जात आहे, सत्ताधारी लोकप्रतिनिधीच्या कपड्यांस हात घातला गेला आहे आदी नेपाळमधील दृश्ये विषण्ण करणारी आहेत. तेथील तरुणांनी क्रांतीची वगैरे हाक दिलेली नव्हती आणि चे गव्हेरा-छापाचे कोणी त्यांचे नायक असल्याचे दिसून आले नव्हते. एके काळी ६०-७० च्या दशकात चे गव्हेरा, फिडेल कॅस्ट्रो हे देशोदेशीच्या तरुणांचे नायक होते आणि त्यांची क्रांतीची भाषा ही तरुणांच्या तोंडी सर्रास असे. तथापि नेपाळी तरुणांचा लौकिक काही असा क्रांतिस्नेही कधीच नव्हता. तरीही त्यांच्या हिमालयीन शांततेचा जे झाले ते धक्कादायक असले तरी यानिमित्ताने तरुणांच्या अशा राजकीय इतिहासाचा आढावा घेणे आणि नेपाळातील तरुणांच्या संतापामागील कारणे शोधणे अगत्याचे ठरते.

गुजरातच्या राजकोटमध्ये एका गेमिंग झोनमध्ये लागलेल्या भीषण आगीत १२ बालकांसह २७ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना शनिवारी संध्याकाळी घडली. तर शनिवारी रात्री उशीरा दिल्लीच्या विवेक विहार येथे असलेल्या बेबी केअर सेंटरला आग लागून त्यामध्ये ७ मुलांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

# अनास्थेचे चिमुकले बळी !

केवळ काही तासांच्या अंतराने नियतीने तब्बल १९ चिमुकल्यांच्या जीवनावर घाला घातला आहे. हृदय पिळवटून टाकणाऱ्या या दोन घटनांनी समाजमन सुन्न झालेले असतानाच केवळ पैशांच्या हव्यासापोटी चिमुकल्यांच्या जीवाशी खेळणाऱ्या नराधमांवर कठोर कारवाई होणार का हा कळीचा प्रश्न आहे.राजकोटच्या प्रकरणात गेमिंग झोनचा मालक आणि तिथल्या मॅनेजरला पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्यांच्यावर निष्काळजीपणाचा आणि त्यामुळे मृत्यू झाल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजकोटच्या गेमिंग झोनमध्ये लागलेल्या भीषण आगीची दखल गुजरात उच्च न्यायालयाने घेतली आहे. न्यायमूर्ती बिरेन वैष्णव आणि न्यायमूर्ती देवन देसाई यांच्या विशेष खंडपीठाने रविवारी सकाळी राज्य सरकार आणि महापालिकांकडून अशा गेमिंग झोन आणि मनोरंजनाच्या सुविधा कोणत्या कायद्याच्या तरतुदींनुसार चालविण्यास परवानगी



दिली आहे, याचा अहवाल मागविला आहे. राजकोट गेमिंग झोनने गुजरात कॉम्प्रिहेन्सिव्ह जनरल डेव्हलपमेंट कंट्रोल रेग्युलेशन्समधील त्रुटींचा फायदा घेतल्याचे दिसून येते. यामुळे बेकायदा गेमिंग झोन तयार करण्याचा मार्ग मोकळा झाला, असे सूचित करणाऱ्या बातम्यांची दखल घेत खंडपीठाने ही मानवनिर्मित आपत्ती असल्याचे खंडपीठाने म्हटले आहे आणि ते खरेच आहे. हे करमणूक झोन संबंधित अधिकाऱ्यांच्या आवश्यक मंजुरीशिवाय करण्यात आले आहेत. गुजरातमध्ये फायर एनओसीसह परवानग्या/एनओसी घेण्यावर मात करण्यासाठी आणि बांधकाम परवानगीसाठी, तात्पुरती संरचना तयार केली गेली आहे, असेही बोलले जात आहे. मुळात हे गेमिंग झोन वरवर पाहता केवळ टिन शेड आहेत. राजकोट शहराव्यतिरिक्त, अहमदाबाद शहरात सिंधू भवन रोड आणि एसपी रिंग रोडवर अशा प्रकारचे गेम झोन तयार झाले आहेत, ज्यामुळे सार्वजनिक सुरक्षेला मोठा धोका निर्माण झाला आहे. प्रमाणपत्रच नसल्याची धक्कादायक माहिती पुढे आली आहे. याबद्दलची माहिती एसआयटी तपास अधिकाऱ्यांनी दिली आहे. नाहरकत प्रमाणपत्र नसतानाही तेथील जिल्हा प्रशासनातील अधिकारी अशाप्रकारे गेमिंग झोन्सला परवानगी देतातच कशी हा मूळ प्रश्न आहे. ही परिस्थिती केवळ गुजरातचीच नसून, देशातील इतर भागांतही असे अनधिकृत गेमिंग झोन चिमुकल्यांचे बळी घेण्यासाठी या उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये सरसावलेले असतील त्यांची शहानिशा संबंधित राज्य सरकार, जिल्हा प्रशासनाने करण्याची नितांत गरज निर्माण झाली आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

टॅबवर वरून वाद

काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांनी केले गंभीर आरोप

# शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा न करता लॅपटॉप!

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**कृषी कर्जमाफी, शेतकरी आत्महत्या आणि अतिवृष्टी बाधितांचा प्रश्न गंभीर असतानाही कृषी विभाग लॅपटॉप द्यायचा की, टॅब द्यायचा यावरून वाद घालत आहे. त्यासाठी बैठकीचे आयोजन केले जात आहे. शेतकरी मेला, शेतकऱ्यांची कुटुंबे उद्ध्वस्त झाली तरीही सरकारला लाज वाटत नाही. शेतकऱ्यांच्या मूळ प्रश्नावर चर्चा करण्यासाठी कृषी विभागाला वेळ नाही, असा आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.**

## तरीही सरकारला लाज वाटत नाही



कर्जमाफीचे खोटे स्वप्न दाखवून शेतकऱ्यांशी गद्दारी करणाऱ्या महायुती सरकारमुळे आठ महिन्यांत तब्बल १,१८३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. पश्चिम विदर्भात ७०७ तर छत्रपती संभाजीनगरमध्ये ५२० शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. सत्तेसाठी या सरकारने भोळ्या – भाबड्या शेतकरी बांधवांना कर्जमाफीचे आश्वासन देऊन मते मिळवली. पण शेतकऱ्यांना मिळाले काय तर कर्जमाफीसाठी समिती.ऑगस्ट महिन्यातील अतिवृष्टीमुळे शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे. हातातील पिके गेली आहेत. बँका कर्ज देत नाहीत. हतबल होऊन शेतकरी टोकाचे पाऊल उचलत आहेत. पण सरकारला काही देणेघेणे नाही. महायुतीतील तीन पक्ष एकमेकांशी भांडतात, समाजात फुट पाडतात आणि शेतकरी मात्र मरत राहतो. हे सरकार गेंड्याच्या कातडीचे झाले आहे.शेतकरी मेला, कुटुंब उद्ध्वस्त झाले तरीही यांना लाज नाही. कृषी खात्यातही शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा न करता कर्मचाऱ्यांना लॅपटॉप द्यायचे का टॅब या वरून वाद सुरू आहेत. हे खाते शेतकऱ्यांसाठी काम करते का ? शेतकरी आत्महत्यांसाठी असंवेदनशील आणि विश्वासघातकी महायुती सरकार जबाबदार आहे, असा आरोपही वडेट्टीवार यांनी केला आहे.कर्जमाफीचे खोटे स्वप्न दाखवून शेतकऱ्यांशी गद्दारी करणाऱ्या महायुती सरकारमुळे आठ महिन्यांत तब्बल १,१८३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. पश्चिम विदर्भात ७०७ तर छत्रपती संभाजीनगरमध्ये ५२० शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. सत्तेसाठी या सरकारने भोळ्या – भाबड्या शेतकरी बांधवांना कर्जमाफीचे आश्वासन देऊन मते मिळवली. पण शेतकऱ्यांना मिळाले काय तर कर्जमाफीसाठी समिती.ऑगस्ट महिन्यातील अतिवृष्टीमुळे शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे. हातातील पिके गेली आहेत. बँका कर्ज देत नाहीत. हतबल होऊन शेतकरी

### लॅपटॉप का टॅब या वरून वाद

हातातील पिके गेली आहेत. बँका कर्ज देत नाहीत. हतबल होऊन शेतकरी टोकाचे पाऊल उचलत आहेत. पण सरकारला काही देणेघेणे नाही. महायुतीतील तीन पक्ष एकमेकांशी भांडतात, समाजात फुट पाडतात आणि शेतकरी मात्र मरत राहतो. हे सरकार गेंड्याच्या कातडीचे झाले आहे.शेतकरी मेला, कुटुंब उद्ध्वस्त झाले तरीही यांना लाज नाही. कृषी खात्यातही शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा न करता कर्मचाऱ्यांना लॅपटॉप द्यायचे का टॅब या वरून वाद सुरू आहेत.


टोकाचे पाऊल उचलत आहेत. पण सरकारला काही देणेघेणे नाही. महायुतीतील तीन पक्ष एकमेकांशी भांडतात, समाजात फुट पाडतात आणि शेतकरी मात्र मरत राहतो. हे सरकार गेंड्याच्या कातडीचे झाले आहे.शेतकरी मेला, कुटुंब उद्ध्वस्त झाले तरीही यांना लाज नाही. कृषी खात्यातही शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा न करता कर्मचाऱ्यांना लॅपटॉप द्यायचे का टॅब या वरून वाद सुरू आहेत. हे खाते शेतकऱ्यांसाठी काम करते का ? शेतकरी आत्महत्यांसाठी असंवेदनशील आणि विश्वासघातकी महायुती सरकार जबाबदार आहे, असा आरोपही वडेट्टीवार यांनी केला आहे.कृषी कर्जमाफी, शेतकरी आत्महत्या आणि अतिवृष्टी बाधितांचा प्रश्न गंभीर असतानाही कृषी विभाग लॅपटॉप द्यायचा की, टॅब द्यायचा यावरून वाद घालत आहे. त्यासाठी बैठकीचे आयोजन केले जात आहे. शेतकरी मेला, शेतकऱ्यांची कुटुंबे उद्ध्वस्त झाली तरीही सरकारला लाज वाटत नाही. शेतकऱ्यांच्या मूळ प्रश्नावर चर्चा करण्यासाठी कृषी विभागाला वेळ नाही, असा आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.कर्जमाफीचे खोटे स्वप्न दाखवून शेतकऱ्यांशी गद्दारी करणाऱ्या महायुती सरकारमुळे आठ महिन्यांत तब्बल १,१८३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. पश्चिम विदर्भात ७०७ तर छत्रपती संभाजीनगरमध्ये ५२० शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. .ऑगस्ट महिन्यातील अतिवृष्टीमुळे शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे.

# अ. जमाती प्रवर्गात समावेशासाठी बंजारा एकवटले

## आ.राठोड यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन; वस्तुस्थिती तपासण्याचे आदेश...

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षण आंदोलनातून 'कुणबी मराठा'च्या नोंदी शोधून काढण्यासाठी हैदराबाद गॅझेटिअरचा आधार घेण्याचे शासनाने मान्य केले. तसेच त्यासंबंधीचा आदेश जारी केल्यानंतर याच गॅझेटिअरचा संदर्भ देत मराठवाड्यातील बंजारा (लमाण) समाजाने आम्हाला अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात समाविष्ट करण्याची मागणी पुढे आणली आहे.**


डॉ. तुषार गोविंदराव राठोड



या मागणीसाठी नांदेड जिल्ह्यात हा समाज संघटित होताना दिसत आहे.मुखेड विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. तुषार राठोड यांनी या मागणीसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची बुधवारी मुंबईमध्ये भेट घेऊन बंजारा समाजाच्या या मागणीसंदर्भात निवेदन सादर केले. हैदराबाद गॅझेटिअरमध्ये बंजारा समाजाचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये करण्यात आला होता. पण महाराष्ट्रात या समाजाला ओबीसी, एनटीसी प्रवर्गात समाविष्ट केले

### उपोषणाचा इशारा

देगलूर येथे प्राचार्य शंकरराव राठोड यांच्या नेतृत्वाखालील एका शिष्टमंडळाने याच मागणीचे निवेदन स्थानिक प्रशासनाकडे सादर केले.हिंगोली येथील प्रा.डी.आर.पवार मागील अनेक वर्षांपासून या मागणीचा पाठपुरावा करत आहेत. भाषावार प्रांतरचनेमुळे मराठवाड्यातील बंजारा समाजावर अन्याय झाला. हैदराबाद राज्यात हा समाज अनुसूचित जमातीत होता.

गेले. मराठा आंदोलनाच्या निमित्ताने शासनाने हैदराबाद गॅझेटिअर स्वीकारले असल्याच्या पार्श्वभूमीवर बंजारा समाजाला एसटी प्रवर्गात समाविष्ट करून या प्रवर्गाच्या आरक्षणाचा लाभ देण्याची मागणी राठोड यांनी केली.मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यांच्या पत्रावर सुस्पष्ट शेरा मारला आहे. याबाबतची वस्तुस्थिती सादर करावी, असे त्यांनी सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांना कळविले. बंजारा समाजातील धर्मप्रचारक बंडू महाराज दापकेकर यांनीही आपल्या समाजाचा समावेश एसटी प्रवर्गात करण्याची मागणी बुधवारी येथे केली.

**ओली यांचा राजीनामा** पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांना राजीनामा द्यावा लागला

# कार्की होणार नेपाळच्या अंतरिम पंतप्रधान?

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**नेपाळमधील 'जेन-झी'ने सरकारविरोधात सुरू केलेल्या निदर्शनांनी मोठ्या प्रमाणात उग्र स्वरूप धारण केलं. त्यामुळे पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांना राजीनामा द्यावा लागला. निदर्शकांचा संताप एवढा होता की निदर्शकांनी नेपाळची संसद, सर्वोच्च न्यायालय आणि इतर महत्त्वाच्या इमारतींना आग लावली. त्यानंतर परिस्थिती हाताबाहेर गेल्याने अखेर के. पी. शर्मा ओली यांनी राजीनामा दिला. सध्या नेपाळमधील परिस्थिती पूर्व पदावर आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.**

## भारताबाबत दिली पहिली प्रतिक्रिया



दरम्यान, आता माजी न्यायाधीश सुशीला कार्की नेपाळच्या अंतरिम पंतप्रधान होण्याची शक्यता आहे. सुशीला कार्की या नेपाळच्या सर्वोच्च न्यायालयाच्या पहिल्या महिला मुख्य न्यायाधीश होत्या. सुशीला कार्की या अंतरिम पंतप्रधान होणार असल्याच्या हालचाली सुरू आहेत. या घडामोडींनंतर सुशीला कार्की यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. यावेळी त्यांनी नेपाळ आणि भारताच्या संबंधांबाबतही भाष्य केलं आहे.सुशीला कार्की यांनी म्हटलं की, 'जेन-झी' निदर्शकांनी अंतरिम प्रशासनाचं नेतृत्व करण्यासाठी त्यांच्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल त्यांना नम्रता वाटत आहे. 'जेन-झी'ने माझ्यावर थोड्या काळासाठी नेपाळच्या सरकारचं नेतृत्व करण्यासाठी विश्वास ठेवला आहे. त्यामुळे आपण राष्ट्रहितासाठी काम करण्यास तयार आहोत, असं सुशीला कार्की यांनी म्हटलं. या संदर्भातील वृत्त सीएनएन न्यूज १८ ने दिलं आहे.कार्की यांनी भारताशी असलेल्या संबंधांबद्दल भाष्य केलं. त्या म्हणाल्या की, "भारत आणि नेपाळमधील संबंध खूप जुने आहेत. भारतात आमचे अनेक नातेवाईक आहेत. आमचे मित्रही आहेत. भारताने नेहमीच मदत केली आहे. मी भारतीय नेत्यांवर खूप प्रभावित आहे. भारतीय मित्र मला बहिणीसारखे वागवतात. मोदीजींना नमस्कार, माझ्या मनात मोदींच्या कार्यशैलीबाबत आदर आहे. भारताने नेपाळला खूप मदत केली आहे. भारतीय नेहमीच नेपाळसाठी शुभेच्छा देतात", असं सुशीला कार्की यांनी म्हटलं.दरम्यान, अंतरिम सरकारबद्दल विचारलं असता सुशीला कार्की यांनी म्हटलं की, "त्यांचं नाव प्रस्तावित करण्यात आलं आहे. पण अद्याप काहीही निश्चित झालेलं नाही. आम्ही अजून यावर बोलत आहोत."सुशीला कार्की या नेपाळच्या मुख्य न्यायाधीश होत्या. नेपाळच्या इतिहासात पहिल्या महिला मुख्य न्यायाधीश म्हणून सुशीला कार्की यांना ओळखलं जातं. तत्कालीन पंतप्रधान केपी शर्मा ओली यांच्या नेतृत्वाखालील संविधानिक परिषदेच्या शिफारशीवरून २०१६ मध्ये तत्कालीन राष्ट्रपती विद्या देवी भंडारी यांनी त्यांची नियुक्ती केली होती. न्यायपालिकेत प्रवेश करण्यापूर्वी कार्की या शिक्षिका होत्या.दरम्यान, आता माजी न्यायाधीश सुशीला कार्की नेपाळच्या अंतरिम पंतप्रधान होण्याची शक्यता आहे. सुशीला कार्की या नेपाळच्या सर्वोच्च न्यायालयाच्या पहिल्या महिला मुख्य न्यायाधीश होत्या. सुशीला कार्की या अंतरिम पंतप्रधान होणार असल्याच्या हालचाली सुरू आहेत. या घडामोडींनंतर सुशीला कार्की यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. यावेळी त्यांनी नेपाळ आणि भारताच्या संबंधांबाबतही भाष्य केलं आहे.सुशीला कार्की यांनी म्हटलं की, 'जेन-झी' निदर्शकांनी अंतरिम प्रशासनाचं नेतृत्व करण्यासाठी त्यांच्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल त्यांना नम्रता वाटत आहे. 'जेन-झी'ने माझ्यावर थोड्या काळासाठी नेपाळच्या सरकारचं नेतृत्व करण्यासाठी विश्वास ठेवला आहे. त्यामुळे आपण राष्ट्रहितासाठी काम करण्यास तयार आहोत, असं सुशीला कार्की यांनी म्हटलं. या संदर्भातील वृत्त सीएनएन न्यूज १८ ने दिलं आहे.कार्की यांनी भारताशी असलेल्या संबंधांबद्दल भाष्य केलं. त्या म्हणाल्या की, "भारत आणि नेपाळमधील संबंध खूप जुने आहेत. भारतात आमचे अनेक नातेवाईक आहेत. आमचे मित्रही आहेत. भारताने नेहमीच मदत केली आहे. मी भारतीय नेत्यांवर खूप प्रभावित आहे.

## सुशीला कार्की कोण आहेत?

भारतीय मित्र मला बहिणीसारखे वागवतात. मोदीजींना नमस्कार, माझ्या मनात मोदींच्या कार्यशैलीबाबत आदर आहे. भारताने नेपाळला खूप मदत केली आहे. भारतीय नेहमीच नेपाळसाठी शुभेच्छा देतात", असं सुशीला कार्की यांनी म्हटलं. दरम्यान, अंतरिम सरकारबद्दल विचारलं असता सुशीला कार्की यांनी म्हटलं की, "त्यांचं नाव प्रस्तावित करण्यात आलं आहे. पण अद्याप काहीही निश्चित झालेलं नाही.

# सल्ला घेणे राज्यपालांना बंधनकारक

## तेलंगण सरकारचा सर्वोच्च न्यायालयात युक्तिवाद

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**खटल्याच्या मंजुरीसाठी राज्यपालांना मंत्रिमंडळाचा सल्ला घेणे बंधनकारक असल्याचा तसेच जेव्हा एखादा मंत्री किंवा मुख्यमंत्री फौजदारी प्रकरणात सामील असतो तेव्हाच राज्यपाल याला बांधील नसतात, असा युक्तिवाद तेलंगण सरकारने सर्वोच्च न्यायालयात केला.**



सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या अध्यक्षतेखालील पाच सदस्यीय घटनापीठात कायदा मंडळाने मंजूर केलेल्या विधेयकांवर विचार करण्यासाठी न्यायालय राज्यपाल आणि राष्ट्रपतींना कालमर्यादा ठरवू शकते का, यावरील राष्ट्रपतींनी विचारलेल्या प्रश्नांवर सर्वोच्च न्यायालय सुनावणी करत आहे. घटनापीठात न्यायमूर्ती सूर्य कांत, न्या. विक्रम नाथ, न्या. पी. एस. नरसिंह आणि न्या. ए. एस. चांदूरकर यांचा समावेश आहे. सुनावणीवेळी तेलंगण सरकारची बाजू मांडताना वरिष्ठ वकील निरंजन रेड्डी यांनी राष्ट्रपतींच्या संदर्भाला उत्तर देताना विधेयकाचा विचार न करण्यामागे राज्यपालांचा पक्षपातदेखील तपासावा लागेल, असा युक्तिवाद केला.आम्हाला आमच्या संविधानाचा अभिमान आहे. आपल्या शेजारील देशांमध्ये काय घडत आहे, ते पहा. नेपाळमध्ये, आपण पाहतच आहोत...' अशी टिप्पणी सरन्यायाधीश भूषण आर. गवई यांनी बुधवारी केली. वरिष्ठ वकिलांनी तमिळनाडूचे उदाहरण देताना कलम २०० अंतर्गत तरतुदीचाही दाखला दिला. या कलमाद्वारे राज्यपालांना सामान्यतः कोणताही विवेकाधिकार राहणार नाही आणि ते मंत्रिमंडळाच्या मदत आणि सल्ल्याने बांधील असतील.

## नियोजित वेळेत कार्यवाही अपेक्षित

राज्य विधिमंडळाने मंजूर केलेल्या विधेयकांच्या संदर्भात राज्यपालांचे अधिकार कलम २०० द्वारे नियंत्रित केले जातात, ज्यामुळे त्यांना विधेयकाला संमती देण्याचा, विधेयक परत करण्याचा किंवा राष्ट्रपतींच्या विचारार्थ विधेयक राखून ठेवण्याचा अधिकार मिळतो.मंगळवारी झालेल्या सुनावणीवेळी कलम २०० मध्ये 'त्वरित' हा शब्द नमूद नसला तरी राज्यपालांकडून नियोजित वेळेत कार्यवाही अपेक्षित असते.

# आतिफ अस्लमने दाखवली लेकीची पहिली झलक

बॉलिवूड गाण्यांमधून लोकप्रियता मिळवणाऱ्या आतिफ अस्लमचे केवळ भारतातच नव्हे तर जगभरात चाहते आहेत. या सुप्रसिद्ध गायकाला एका वर्षापूर्वी कन्यारत्नाचा लाभ झाला. आतिफची पत्नी साराने २३ मार्च २०२३ला गोंडस बाळाला जन्म दिला आणि सोशल मीडियावरुन आतिफने बाबा झाल्याची गुडन्यूज चाहत्यांना दिली होती. आज (२३ मार्च रोजी) आतिफ त्याच्या गोंडस मुलीचा पहिला वाढदिवस साजरा करत आहे त्यानिमित्ताने आतिफने पहिल्यांदाच त्याच्या मुलीचा हलीमाचा फोटो शेअर केला आहे.आतिफ अस्लमने त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक फोटो शेअर केला आहे. बरोबर एका वर्षानंतर आज पहिल्यांदाच त्याने हलीमाचा चेहरा जगासमोर आणला आहे. पहिल्या फोटोत बाबा आतिफ हलीमाबरोबर खेळताना दिसतोय. तर दुसऱ्या फोटोत सफेद फ्रॉकवर हलिमा एकदम गोंडस दिसत आहे. या पोस्टला आतिफने कॅप्शन देत लिहिले, "बाबाने राजकन्येचे शूज खिशात ठेवले आहेत, जेव्हा माझ्या हलीमाला तो हवा असेल तेव्हा ती सांगेल. २३/०३/२०२३- तुला वाढदिवसाच्या खूप साऱ्या शुभेच्छा.

"आतिफच्या लाडक्या लेकीचा फोटो सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या पोस्टवर आतिफच्या अनेक चाहत्यांनी प्रतिक्रिया दिल्या आहेत. एकाने कमेंट करत लिहिले, "किती सुंदर आहे हलीमा, तुला वाढदिवसाच्या खूप शुभेच्छा". "अल्लाह तुमच्या जीवनात आनंद आणि आशीर्वाद घेऊन येवो. वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा गोंडस हलीमा" असं दुसऱ्याने लिहिलं.दरम्यान, आतिफ अस्लमच्या वैयक्तिक आयुष्याबाबत सांगायचं झालं तर, २०१३मध्ये आतिफने साराशी लाहौरमध्ये निकाह केला होता. त्यांना अब्दुल व अर्यान ही दोन मुले आहेत आणि हलीना त्यांची तिसरी अपत्य आहे. पाकिस्तानी सिंगर असलेल्या आतिफने बॉलिवूडमध्ये नाव कमावलं. त्याची अनेक गाणी लोकप्रिय आहेत.बॉलिवूड गाण्यांमधून लोकप्रियता मिळवणाऱ्या आतिफ अस्लमचे केवळ भारतातच नव्हे तर जगभरात चाहते आहेत. या सुप्रसिद्ध गायकाला एका वर्षापूर्वी कन्यारत्नाचा लाभ झाला. आतिफची पत्नी साराने २३ मार्च २०२३ला गोंडस बाळाला जन्म दिला आणि सोशAल मीडियावरुन आतिफने बाबा झाल्याची गुडन्यूज चाहत्यांना दिली होती.

## गोविंदाने पुन्हा केलं लग्न

सध्या बॉलीवूड अभिनेता गोविंदा खूप चर्चेत आला आहे. एकाबाजूला तो राजकारणात पुन्हा एन्ट्री करणार असल्याची चर्चा आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंबरोबर त्याची भेट झाल्याचं म्हटलं जात आहे. त्यामुळे गोविंद पुन्हा एकदा लोकसभा निवडणुकाच्या रिंगणात उतरणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. अशातच दुसऱ्या बाजूला गोविंदाने ३७ वर्षांनंतर पुन्हा एकदा लग्न केलं आहे. याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होतं आहे. अभिनेता गोविंदा व त्याची पत्नी सुनीता आहुजा 'डान्स दिवाने'च्या चौथ्या पर्वात उपस्थित राहिले होते. याच सेटवर 'कलर्स टीव्ही'च्या इन्स्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आला आहे.या व्हिडीओत, माधुरी दीक्षित म्हणतेय "आमच्याकडे लग्नाचे फोटो देखील नाहीयेत." तर माधुरी म्हणते, "फोटो नाहीत, काही हरकत नाही. 'डान्स दिवाने'चं कुटुंब आहे.

## कंगना अडकणार लग्नबंधनात?



मागील काही महिन्यांत अनेक बॉलीवूड कलाकार आपल्या आयुष्याला नवीन सुरुवात करीत लग्नबंधनात अडकले आहेत. आधी रकुल प्रीत सिंग व जॅकी भगनानी आणि आता क्रिती खरबंदा व पुलकित सम्राट यांनी लग्नगाठ बांधली. आता बॉलीवूडची क्वीन कंगना रणौतही तिच्या नवीन आयुष्याला लवकरच सुरुवात करणार असल्याची माहिती समोर आली आहे. कंगनाने आपल्या लग्नाचे कपडेदेखील निवडले असल्याची चर्चा सुरू आहे. 'रेडिट'वर आलेल्या माहितीनुसार, कंगना आपल्या लग्नातील पोशाख एका ड्रेस डिझायनरकडून तयार करून घेणार आहे. कंगनाचा हा ड्रेस डिझायनर इंडस्ट्रीमधलाच आहे; पण तितकासा सुप्रसिद्ध नाही. कंगनाच्या लग्नाबद्दलच्या गोष्टी खासगी ठेवण्यात आल्या आहेत. कंगना कोणाशी लग्न करणार आहे हे अजून जाहीर झालं नसलं तरी तिचा बॉयफ्रेंड आहे, असं तिनं आधी कबूल केलं होतं. रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात कंगनानं हजेरी लावली होती. त्यादरम्यान, कंगना आणि निशांतचे अयोध्येतील राम मंदिरातील काही फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते आणि त्यामुळेच कंगना निशांतला डेट करीत असल्याच्या चर्चांना उधाण आलं होतं. पण, अभिनेत्रीनं या अफवा असल्याचं स्पष्ट केलं आणि ती दुसऱ्याच कोणाला तरी डेट करतेय; परंतु तो निशांत नाही, असा खुलासा तिनं केला होता.निशांत पिट्टीबरोबर कंगनाचं अफेअर असल्याचा दावा करणाऱ्या मीडिया रिपोर्टचा स्क्रीनशॉट शेअर करीत कंगनानं तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर लिहिलं, "माझी मीडियाला नम्र विनंती आहे की, कृपया चुकीची माहिती पसरवू नका. निशांतजी विवाहित आहेत आणि मी दुसऱ्या कोणाला तरी डेट करीत आहे. योग्य वेळ आल्यावर मी त्याबद्दल सांगेन. एका महिलेनं एखाद्या पुरुषाबरोबर फोटो काढल्यानं रोज तिचं नाव एखाद्या नवीन पुरुषाशी जोडणं योग्य नाही."मध्यंतरी कंगना एका परदेशी व्यक्तीबरोबर हातात हात धरून चालताना दिसली होती. तेव्हा तो तिचा बॉयफ्रेंड असल्याच्या चर्चाही सुरू होत्या. कंगना स्पष्टवक्ती आहे आणि प्रत्येक गोष्ट ती सोशल मीडियावर शेअर करते. अशात तिच्या लग्नाची बातमी ती चाहत्यांपासून का लपवून ठेवेल.

## शाहरुख खान करतो कोटींची कमाई

शाहरुख खानला बॉलीवूडमधील किंग खान या नावाने ओळखले जाते. शाहरुखचं वैयक्तिक आयुष्यही एका राजासारखंच आहे. शाहरुख आपल्या अभिनयाच्या जोरावर एका चित्रपटात कोटींची कमाई करतो. अभिनय क्षेत्रात तर किंग खानचा पाय रोवला गेला आहे पण शाहरुख क्रिकेटद्वारेसुद्धा बक्कळ कमाई करतो. २०२४च्या आयपीलच्या हंगामाला सुरूवात झाली असून कालच 'चेन्नई सुपर किंग्ज' विरुद्ध 'रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू' यांचा पहिला सामना पार पडला. 'चेन्नई सुपर किंग्ज'ने या सामन्यात बाजी मारली. तर आज 'कोलकाता नाइट रायडर्स' आणि 'सनरायझर्स हैदराबाद' यांचा सामना सुरू झाला आहे. शाहरुख खान 'कोलकाता नाइट रायडर्स' या टीमचा मालक आहे. आयपीलमधून दरवर्षी शाहरुखची किती कमाई होते याबद्दल जाणून घेऊयात.प्रत्येक आयपीएल संघाला टीव्ही ब्रॉडकास्ट आणि बीसीसीआयच्या प्रायोजकत्वातून मिळणाऱ्या कमाईचा काही हिस्सा मिळतो. शाहरुख खान आयपीएलमधील 'कोलकाता नाईट रायडर्स' संघाचा मालक आहे. या संघाद्वारे, शाहरुख खान ब्रँड एंडोर्समेंट्स, मॅच फी, फ्रँचायझी फी, BCCI इव्हेंट रेव्हेन्यू आणि बक्षीस रकमेतून भरपूर कमाई करतो. मात्र, यातून त्यांना किती कोटींची कमाई होते, याचा खुलासा झालेला नाही. मीडिया रिपोर्ट्सनुसार, शाहरुख खान आयपीएलमधील त्याच्या टीममधून दरवर्षी २५० ते २७० कोटी रुपयांची कमाई करतो. मात्र, या सामन्यांमध्ये अंदाजे १०० कोटींचा खर्चही होतो. हा सगळा खर्च खेळाडूंच्या खरेदी आणि व्यवस्थापनावर होतो.'कोलकाता नाईट रायडर्स'ची या संघाची कमाई १५० कोटींहून अधिक आहे. या संघात शाहरुख खानची हिस्सेदारी ५५ टक्के आहे, त्यामुळे अभिनेता दरवर्षी आयपीएलमधून ७० ते ८० कोटी कमावतोआयपीएल सुरू झाले तेव्हा शाहरुखने अभिनेत्री जुही चावला आणि तिचा पती जय मेहता यांच्या भागीदारीत संघ विकत घेतला.



## 'मिस युनिव्हर्स' मध्ये सहभागी होण्यास मनाई

उर्वशी रौतेलाने तिच्या करिअरची सुरूवात मॉडेलिंगपासून केली. २०१२ साली 'आय एम शी – मिस युनिव्हर्स इंडिया' सौंदर्यस्पर्धेत ती जिंकली होती. परंतु 'मिस युनिव्हर्स' २०१२ मध्ये तिला सहभागी होता आले नाही याची खंत तिला नेहमी वाटते. २०१२ सालची 'आय एम शी – मिस युनिव्हर्स इंडिया' स्पर्धा जिंकल्यानंतर उर्वशी रौतेलाचं पुढचं ध्येय 'मिस युनिव्हर्स' जिंकण्याचं होतं. परंतु, शेवटच्या क्षणी काही अडचणी आल्यामुळे तिला ते साध्य करता आलं नाही. तेव्हा भारताचे प्रतिनिधी निवडण्याची जबाबदारी सुष्मिता सेन यांच्या कंपनीकडे होती.'मिरची प्लस'ला दिलेल्या मुलाखतीत उर्वशीने याबाबत खुलासा केला. ती म्हणाली, "मी जेव्हा २०१२ मध्ये पहिल्यांदा 'मिस युनिव्हर्स इंडिया'चा किताब जिंकले. तेव्हा डोनाल्ड ट्रम्प आमचे बॉस होते 'मिस युनिव्हर्स'साठी वयाची मर्यादा आहे. 'मिस युनिव्हर्स'स मध्ये सहभाग घेण्यासाठी वय मर्यादा १८ होती. याबद्दल मला काहिचं माहित नव्हतं. मी तेव्हा १७ वर्षांची होती आणि लवकरच १८ वर्षांची होणार होती.

भारताने जिंकला सामना!

## कुलदीप-शिवम दुबे-अभिषेक ठरले विजयाचे हिरो

# भारताने 27 चेंडूत जिंकला सामना!

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय संघाने पॉवरप्लेमध्येच युएईविरूद्ध ९ विकेट्सने दणदणीत विजय मिळवला आहे. भारताने पहिल्याच सामन्यात विजय मिळवत गुणतालिकेत आपलं खातं उघडलं. टीम इंडियाने अवघ्या २७ चेंडूत ५८ धावांचं लक्ष्य गाठत दणक्यात सुरूवात केली आहे. कुलदीप यादवने ४ तर शिवम दुबेने ३ विकेट्स घेत युएईच्या फलंदाजांना गुडघे टेकण्यास भाग पाडलं.**

## भारताने दणदणीत विजय मिळवला



भारतीय संघाने त्यांच्या शानदार फलंदाजी आणि गोलंदाजीसह यूएईचा पराभव करून स्पर्धेची सुरुवात विजयाने केली. अभिषेक शर्मा आणि शुबमन गिल यांच्या जोडीने भारताने सहज सामना जिंकला. सूर्यकुमार यादवने २ चेंडूत ७ धावा करत संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केला.अनुनभवी युएईसाठी अलिशान शराफू आणि कर्णधार मुहम्मद वासीम यांनी संघाला २६ धावांची सलामी दिली. टीम इंडियाचं प्रमुख अस्त्र असलेल्या जसप्रीत बुमराहने शराफूला त्रिफळाचीत करत ही जोडी फोडली. त्याने २२ धावांची खेळी केली. पुढच्याच षटकात मुहम्मद झोहेबला वरुण चक्रवर्तीने तंबूचा रस्ता दाखवला. राहुल चोप्रा कुलदीप यादवची पहिली शिकार ठरला. शिवम दुबेने असिफ खानला स्थिरावू दिलं नाही. खेळपट्टीवर नांगर टाकण्याची इच्छा असलेल्या वासीमला कुलदीपने पायचीत केलं. त्याने १९ धावांची खेळी केली. कुलदीपनेच हर्षित कौशिकला माघारी धाडलं.शिवम दुबेची मध्यमगती गोलंदाजी ध्रुव पराशरसाठी बाऊन्सर ठरली. तो एका धावेचं योगदान देऊ शकला. अक्षर पटेलने आपली कुशलता सिद्ध करत सिमरजीतला तंबूत धाडलं. कुलदीप यादवने हैदर अलीला बाद केलं. चांगल्या सुरुवातीनंतर युएईचा डाव पत्त्याचा बंगला कोसळावा तसा कोसळला. १३.१ षटकात युएईचा डाव ५७ धावांतच गडगडला. कुलदीप यादवने २.१ षटकात अवघ्या ७ धावात ४ विकेट्स पटकावल्या. शिवम दुबेने २ षटकात केवळ ४ धावा देत ३ विकेट्स घेतल्या. जसप्रीत बुमराह, अक्षर पटेल आणि वरुण चक्रवर्ती यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. कुलदीप यादवला सामनावीराचा पुरस्कारही देण्यात आला.युएईने दिलेले ५८ धावांचे लक्ष्य भारताने २७ चेंडूत गाठलं. भारताकडून अभिषेक शर्माने पहिल्याच चेंडूवर षटकार लगावत आक्रमक सुरूवात केली. अभिषेकने १६ चेंडूत २ चौकार आणि ३ षटकारांसह झटपट ३० धावा केल्या. मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्नात अभिषेक झेलबाद झाला. तर शुबमन गिलने ९ चेंडूत २ चौकार आणि एका षटकारासह २० धावा केल्या. तर सूर्यकुमार यादवने ७ धावा करत चौकारासह संघाला विजय मिळवून दिला. युएईकडून जुनैद सिद्दिकीने एक विकेट घेतली.कुलदीप यादवला सामनावीराचा पुरस्कारही देण्यात आला. भारतीय संघाचा पुढील सामना १४ सप्टेंबरला रविवारी पाकिस्तानविरूद्ध होणार आहे. सर्वांच्या नजरा या सामन्यावर आहेत.भारतीय संघाने त्यांच्या शानदार फलंदाजी आणि गोलंदाजीसह यूएईचा पराभव करून स्पर्धेची सुरुवात विजयाने केली. अभिषेक शर्मा आणि शुबमन गिल यांच्या जोडीने भारताने सहज सामना जिंकला. सूर्यकुमार यादवने २ चेंडूत ७ धावा करत संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केला.अनुनभवी युएईसाठी अलिशान शराफू आणि कर्णधार मुहम्मद वासीम यांनी संघाला २६ धावांची सलामी दिली. टीम इंडियाचं प्रमुख अस्त्र असलेल्या जसप्रीत बुमराहने शराफूला त्रिफळाचीत करत ही जोडी फोडली. त्याने २२ धावांची खेळी केली. पुढच्याच षटकात मुहम्मद झोहेबला वरुण चक्रवर्तीने तंबूचा रस्ता दाखवला. राहुल चोप्रा कुलदीप यादवची पहिली शिकार ठरला. शिवम दुबेने असिफ खानला स्थिरावू दिलं नाही. खेळपट्टीवर नांगर टाकण्याची इच्छा असलेल्या वासीमला कुलदीपने पायचीत केलं. कुलदीपनेच हर्षित कौशिकला माघारी धाडलं.शिवम दुबेची मध्यमगती गोलंदाजी ध्रुव पराशरसाठी बाऊन्सर ठरली.

## अवघ्या ७ धावात ४ विकेट्स

तो एका धावेचं योगदान देऊ शकला. अक्षर पटेलने आपली कुशलता सिद्ध करत सिमरजीतला तंबूत धाडलं. कुलदीप यादवने हैदर अलीला बाद केलं. चांगल्या सुरुवातीनंतर युएईचा डाव पत्त्याचा बंगला कोसळावा तसा कोसळला. १३.१ षटकात युएईचा डाव ५७ धावांतच गडगडला. कुलदीप यादवने २.१ षटकात अवघ्या ७ धावात ४ विकेट्स पटकावल्या.

# कुलदीपची फिरकी ठरली टर्निंग पॉईंट

## झेलबाद, पायचीत, बोल्ड; एका षटकात 3 विकेट्स!

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आशिया चषक २०२५ ला भारताने दणक्यात सुरूवात केली. युएईविरूद्ध पहिल्याच सामन्यात भारताच्या गोलंदाजांनी भेदक गोलंदाजी करत फलंदाजांना मैदानावर टिकू दिलं नाही. भारताच्या सर्वच गोलंदाजांनी उत्कृष्ट गोलंदाजी करत युएईला अवघ्या ५७ धावांवर सर्वबाद केलं. टीम इंडियाचा चायनामन गोलंदाज कुलदीप यादवच्या गोलंदाजीने तर कहर केला. त्याने एका षटकात ३ विकेट्स घेत सामना भारताच्या बाजूने फिरवला.**






स्टार फिरकी गोलंदाज कुलदीप यादवच्या गोलंदाजीने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं. कुलदीप वर्षाहून अधिक काळानंतर भारताकडून टी-२० सामना खेळण्याची संधी मिळाली. त्याने या संधीचा पुरेपूर फायदा घेतला आणि फक्त एका षटकात युएई संघाला बॅकफूटवर टाकलं.

कुलदीप यादवचं टी-२० क्रिकेटमधील हे पुनरागमन कमालीचं ठरलं. त्याने यापूर्वी जून २०२४ टी-२० विश्वचषकात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध अंतिम फेरीत अखेरचा टी-२० सामना खेळला होता.

कुलदीप यादवने यूएईविरुद्धच्या पहिल्याच षटकात अतिशय किफायतशीर गोलंदाजी केली आणि फक्त ४ धावा दिल्या.त्यानंतर कुलदीपने त्याच्या दुसऱ्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर राहुल चोप्राची विकेट घेतली. मोठा फटका खेळताना राहुल चोप्रा शुबमन गिलच्या हाती झेलबाद झाला. नंतर, कुलदीप यादवने षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर १ धाव दिली आणि तिसऱ्या चेंडूवर एक डॉट बॉल टाकला. चौथ्या चेंडूवर, त्याने यूएईचा कर्णधार मोहम्मद वसीमला पायचीत करत संघाला महत्त्वाची विकेट मिळवून दिली.

## फक्त ७ धावा देत ४ विकेट्स

कुलदीपने षटकाच्या शेवटच्या चेंडूवर हर्षित कौशिकला क्लीन बोल्ड करत पॅव्हेलियनमध्ये धाडलं. कुलदीप यादवच्या या जादुई गोलंदाजीमुळे युएईचा निम्मा संघ माघारी परतला. या एका षटकात लागलेल्या धक्क्यांमधून युएईचा संघ सावरू शकला नाही. तर १०वी विकेट घेत कुलदीपने २.१ षटकांत फक्त ७ धावा देत ४ विकेट्स घेतल्या.

महाईन्यूज ™
स्मार्ट PCMC SMART CITY
epaper.mahaenews.com
ePaper
। गुरुवार ।
। दि. 11 सप्टेंबर 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## समाजसेवा आणि सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सातत्याने आघाडी

# चिंचवडच्या श्री अग्रसेन ट्रस्टची नवनिर्वाचित कार्यकारिणी जाहीर!

### समाजहिताला अधिक प्राधान्य देण्यासाठी वचनबद्ध राहण्याचा पदाधिकाऱ्यांचा संकल्प







। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**समाजसेवा आणि सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सातत्याने आघाडी घेणाऱ्या श्री अग्रसेन ट्रस्ट, चिंचवडची नवनिर्वाचित कार्यकारिणी (कार्यकाळ २०२५-२०२८) नुकतीच जाहीर झाली.**

निवड प्रक्रिया पंच सदस्य कृष्णकुमार गोयल, रामअवतार अग्रवाल, वेदप्रकाश गुप्ता आणि डॉ. रमेश शिवनारायण बंसल यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

**असे आहेत नवीन पदाधिकारी**

अध्यक्ष – मोहन जे. गर्ग, कार्याध्यक्ष – विकास तरसेम गर्ग, उपाध्यक्ष – अशोक आर. अग्रवाल, सचिव – आशीष पी. गर्ग, सहसचिव पवन अग्रवाल, कोषाध्यक्ष – धर्मेंद्र जे. अग्रवाल, सहकोषाध्यक्ष - दिनेश अग्रवाल, भवन निर्माण समिती, अध्यक्ष – लाजपतराय मित्तल, उपाध्यक्ष नरेश एच. गुप्ता, भवन व्यवस्थापक – महावीर एम. बंसल, वैद्यकीय समिती – जगमोहन अग्रवाल, प्रवीण अग्रवाल, सांस्कृतिक समिती अध्यक्ष – विकास गर्ग, उपाध्यक्ष, राजेश अग्रवाल, दिनेश अग्रवाल, आशिष गर्ग, मुख्य मार्गदर्शक – रमेश अग्रवाल, कार्यकारिणी सदस्य – विनोद मित्तल.

**समाजहिताला गती देण्याची जबाबदारी**

या नवनिर्वाचित कार्यकारिणीकडून समाजहित, सांस्कृतिक प्रगती आणि युवकांना प्रेरणा देणाऱ्या उपक्रमांना नवे चैतन्य मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. पंच समिती सदस्यांनी सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

**परंपरा आणि अपेक्षा...**

श्री अग्रसेन ट्रस्टने सदैव समाजात ऐक्य, सहयोग आणि सेवाभाव जपण्याचा वारसा पुढे नेला आहे. नव्या कार्यकारिणीमुळे समाजजीवनात सकारात्मक बदल आणि नवीन उर्जा निर्माण होईल, असा विश्वास समाजजनांनी व्यक्त केला आहे.

---

## बटरफ्लाय पूल ठरतोय आकर्षण

### उच्च दर्जाचे एलईडी तंत्रज्ञान वापरून विद्युत रोषणाई

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**झगमगाटाने उजळलेला पूल... विविध रंगांच्या छटा निर्माण करणारी रोषणाई... असा वेगळाच अनुभव थेरगाव ते चिंचवड दरम्यानच्या बटरफ्लाय पुलावरून प्रवास करताना नागरिकांना येत आहे. पवना नदीवर उभारलेला हा पूल आता रोषणाईच्या झळाळीने अधिकच खुलून दिसत असून, रात्रीच्या वेळी पुलावर साकार होणारा हा रंगोत्सव नागरिकांना आकर्षित करत आहे.**



पिंपरी चिंचवड महापालिकेकडून शहरात आधुनिक पायाभूत सुविधा उभारण्याबरोबरच शहरात सौंदर्यपूर्ण वास्तू उभारण्यावर भर दिला जात आहे. थेरगाव येथे पवना नदीवर पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने उभारण्यात आलेला बटरफ्लाय पूल हा त्याचाच एक भाग आहे. हा पूल आता शहराचे एक नवे आकर्षण ठरत आहे. पुलाचे अनोखे डिझाइन हे शहराच्या सौंदर्यात भर घालणारे असून, आता महापालिकेच्या विद्युत विभागाच्या वतीने पुलावर करण्यात आलेली आकर्षक विद्युत रोषणाई त्याच्या देखणेपणात अधिकच भर घालत आहे. या रोषणाईसाठी उच्च दर्जाचे एलईडी लिनिअर वॉश लाईट्स (IP65) बसवण्यात आले आहेत. या लाईट्सना ५१२ डीएमएक्स पॉवरसह आरजीबी तंत्रज्ञानाची जोड देण्यात आली असून, त्यामुळे पुलावरील रोषणाई विविध रंगांच्या छटा निर्माण करत प्रत्येक क्षणी वेगळेच दृश्य साकारते. रात्रीच्या वेळी पुलावरून जाणाऱ्या वाहनचालकांसाठी तसेच परिसरातील नागरिकांसाठी हा अनुभव नेत्रसुखद ठरत आहे. येथील आकर्षक रोषणाईची अनेकजण छायाचित्रे व व्हिडिओ घेत आहेत. त्यामुळे हा पूल फक्त वाहतुकीपुरता मर्यादित न राहता नागरिकांसाठी आणि पर्यटकांसाठी एक महत्त्वाचे पर्यटनस्थळ ठरत आहे.

**नयनरम्य विद्युत रोषणाई**

थेरगाव येथील बटरफ्लाय पुलाप्रमाणेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून चिंचवड येथील मदर तेरेसा उड्डाणपूल, नाशिक फाटा येथील जे. आर. डी. टाटा उड्डाणपूल यांना नयनरम्य विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. तसेच भक्तीशक्ती येथील उड्डाणपुलावरील विद्युत रोषणाईचे काम प्रगतीपथावर आहे. या विद्युत रोषणाईसाठी एलईडी दिव्यांचा वापर केल्यामुळे कमी विजेमध्ये आकर्षक रोषणाई होत आहे.

> “ बटरफ्लाय पूल हा केवळ थेरगाव आणि चिंचवड यांना जोडणारा दुवा नसून, पिंपरी चिंचवड शहराच्या आधुनिक आणि सौंदर्यपूर्ण ओळखीचे प्रतीक आहे. या पुलावरील आकर्षक रोषणाईमुळे नागरिकांना नवा अनुभव मिळत आहे. या पुलाचे सौंदर्य जपणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.
>
> **-शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका**


College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.
PDEA
Pharmacy Council of India
SPPU Affiliation
A
NAAC
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education
Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26
Admission Schedule for
F.Y.B.Pharm
Online Registration & Document Upload
07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM)
Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC)
08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Display of Provisional Merit List
25 July 2025
Grievance Submission (Online / at FC)
26 – 28 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Final Merit List
31 July 2025
Your Trusted Facilitation Centre!
FC Code 6372
Important Note:
• Bring all original + Xerox copies of documents
• Late registrations after 14 July are for Non-CAP seats only
"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"
Confirm
Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad

College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.

PDEA

Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education

Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26

Admission Schedule for
F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |



Your Trusted Facilitation Centre!

FC Code 6372

Important Note:
- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"

Confirm Your



Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046